| | |
|---|---|
| | दाखल दिनांक : – २३.११.२०२२<br>नोंदणी दिनांक : – २३.११.२०२२<br>निकाल दिनांक :– २३.०६.२०२५<br>कालावधी :– **०२** वर्षे, **०७** महिने, **००**दिवस |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सावली, जिल्हा चंद्रपूर यांचे न्यायालयात.**

**( पिठासीन अधिकारी – श्याम एस. तोंडचिरे )**

**(न्यायनिर्णय अधिघोषित दिनांक – २३.०६.२०२५ )**

**संक्षीप्त फौजदारी खटला क्रमांक – ३६९/२०२२** **निशाणी क्रमांक – ३५**

**CNR No. MHCH140006502022**

गुन्हा नोंद क्र. ९१/२०२२, पो. स्टे. पाथरी.

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष.** | | **महाराष्ट्र शासन,**<br>तर्फे सहा. पोलीस उप–निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन, पाथरी,<br>ता. सावली जिल्हा चंद्रपूर. |
| **अभियोग पक्षा तर्फे.** | | सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. डब्लु. डोंगरे |
| **आरोपी.** | | **अशोक बाबुराव मेश्राम,**<br>वय– ४० वर्षे, कामधंदा– मजुरी,<br>रा. हेटी वार्ड, पाथरी,<br>ता. सावली, जि. चंद्रपूर. |
| **आरोपी तर्फे विधीज्ञ.** | | अधिवक्ता श्री. पी. पी. वैरागडे |

**भाग– ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(ii)अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| वर्दी दाखल दिनांक | | २०.०७.२०२२ |
| दोषारोप पत्र पाठविल्याचा दिनांक | | २३.११.२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | | २३.११.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | | २३.११.२०२२ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयासाठी राखूण ठेवल्याचा दि. | | २३.०६.२०२५ |
| न्यायनिर्णय दिनांक | | २३.०६.२०२५ |
| न्यायनिर्णयातील शिक्षे संदर्भात आदेशाचा दिनांक | | निरंक, आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नावे | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दि. | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. क. ४२८ अन्वये समायोजीत (Set off) करणे बाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | **अशोक बाबुराव मेश्राम,** | निरंक | २३.११.२०२२ | भा.दं.वि. चे कलम २७९, ३३७, ३३८ व मो.वा.कायद्याचे कलम १७७ सहकलम १३४ अन्वये | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

## भाग– क

## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(iii)अन्वये)

| सा.क्र. | साक्षीदारांची नावे | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ०१ | मोरेश्वर रामजी गेडाम | घटनास्थळ पंच | १४ |
| ०२ | रोशन प्रकाश पेंदाम | वर्दीदार | १५ |
| ०३ | सचिन हजबाजी कोलते | साक्षीदार | १८ |
| ०४ | कौशल्याबाई हजबाजी कोलते | साक्षीदार | १९ |
| ०५ | कविता प्रभाकर पेंदाम | साक्षीदार | २० |
| ०६ | मोरेश्वर नाररायण आळे | साक्षीदार | २१ |
| ०७ | प्रभाकर आबाजी पेंदाम | जखमी साक्षीदार | २२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ०८ | खुशाल श्रावण मडावी | पोलीस साक्षीदार | २८ |
| ०९ | वसंत मारोती नागरीकर | तपास अधिकारी | ३० |
| १० | प्रकाश मारोती मेश्राम | घटनास्थळ पंच | ३१ |

**अभियोग पक्षातर्फे दाखल करण्यात आलेले दस्त**

| द.क्र. | निशाणी | दस्त वर्णन |
|---|---|---|
| ०१ | २९ | घटनास्थळ पंचनामा |
| ०२. | १६ | तक्रार |
| ०३. | १७ | छापील प्रथम खबरी अहवाल |

**न्यायालया मार्फत निशाणी देण्यात आलेले दस्त**

| द.क्र. | निशाणी | दस्त वर्णन |
|---|---|---|
| ०१ | दोषारोप पत्र | ०१ |
| ०२ | फेरीस्त | ०२ |

**बचाव पक्षाचा पुरावा**

| द.क्र. | निशाणी | दस्त वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभिलेखावरील मुद्देमाल**

| म.क्र. | मुद्देमाल क्र. | दस्त वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य

## (दिनांक २३ जुन, २०२५ अधिघोषित)

प्रस्तुत प्रकरणी आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८ (तद्नंतर भा.दं.वि. असे संबोधण्यात येईल) तसेच मोटार वाहन कायद्याचे

कलम १७७ सहकलम १३४ अन्वये प्रकरण चालविण्यात आले.

**<u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे</u>** –

**०२.** वर्दीदार नामे रोशन प्रकाश पेंदाम यांनी दिनांक २०.०७.२०२२ रोजी वर्दी दिली की, दि.१२.०७.२०२२ रोजी अंदाजे १२.३० वाजताच्या सुमारास ते मौजा मेहाबुज येथे घरी हजर असतांना त्यांचा मित्र नामे सचिन हरबाजी कोलते रा. मेहा याने त्यांना फोन करुन सांगितले की, तुझे काका प्रभाकर पेंदाम यांचा भानापूर फाट्याजवळ ट्रॅक्टरने अपघात होवून जखमी झाला आहे. तेव्हा ते लगेच मोरेश्वर आडे यांच्यासोबत भानापुर फाट्यावर आले असता त्या ठिकाणी लाल रंगाचा विना क्रमांकाचा ट्रॅक्टर उभा होता. त्यांचे काका मोटारसायकलसह जखमी अवस्थेत खाली पडून होते. अपघाताबाबत काकांना विचारना केली असता, ते पाथरीकडे मोटारसायकलने जात असतांना, भानापूर फाट्याजवळ पाथरी क्याजव्हील लावलेला विना क्रमांकाचा ट्रॅक्टर येत होता व सदर ट्रॅक्टर चालकाने त्यांच्या मोटारसायकलला धडक मारल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांनी ट्रॅक्टर चालक आरोपी नामे अशोक मेश्राम यावर कार्यवाही होण्यासाठी तक्रार दिली.

**<u>गुन्हा अन्वेषण</u>** :–

**०३.** वर्दी अन्वये आरोपी विरुध्द गु.र.क्र. ९१/२०२२ भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८ तसेच मोटार वाहन कायद्याचे कलम १७७ सहकलम १३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचे अन्वेषण वसंत मारोती नागरीकर, पोलीस हवालदार यांनी केले. अन्वेषण कामी अन्वेषण अधिका–याने घटनास्थळी भेट देऊन, घटनास्थळ पंचनामा तयार केला. तद्नंतर, त्यांनी वर्दीदार व साक्षीदारांची जबानी नोंदविली. आरोपी विरुध्द सबळ पुरावा निष्पन्न झाल्याने, उपरोक्त नमुद कलमांखाली फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७३(२) अन्वये न्यायालयात दोषारोप–पत्र

दाखल केले.

**<u>दोषारोप निश्चिती व आरोपीचा जबाब</u> :-**

**०४.** सदर प्रकरणात आरोपी हजर झाल्यानंतर, आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २०७ अन्वये दस्ताची पुर्तता केली. तद्नंतर, माझे पुर्व पिठासन अधिकारी यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४० अन्वये **(निशाणी क्र.११)** भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८ तसेच मोटार वाहन कायद्याचे कलम १७७ सहकलम १३४ अन्वये गुन्ह्यासाठी दोषारोप निश्चीत केला. आरोपीचे निवेदन **(निशाणी क्र.१२)** अन्वये नोंदविले व त्यांनी गुन्हा नाकबुल करुन, प्रकरणाची संपरिक्षा करणेची याचना केली.

**<u>अभियोग पक्षाचा साक्षीपुरावा</u> :-**

**०५.** अभियोग पक्षातर्फे वर नमुद तोंडी पुरावा व कागदोपत्री सादर केला. अभियोगपक्ष उर्वरीत साक्षीदारांना हजर करु शकले नाही. तसेच प्रकरण हे दोन वर्षे जूने असल्यामुळे, अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**०६.** आरोपीने स्वतःच्या बचावासाठी स्वतःस साक्षीदार म्हणुन तपासले नाही अगर इतर कोणताही पुरावा दाखल केला नाही. संपरीक्षे दरम्यान उभय पक्षांचा पुरावा संपुष्ठात आल्यानंतर, अभिलेखावर पुराव्याच्या अवलोकनांती, सबळ पुरावा अभिलेखावर दिसून आला असल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३-१(ब) अन्वये **निशाणी क्र.३४** अन्वये निवेदन नोंदविण्यात आले. आरोपीचा बचाव संपूर्णपणे नकारात्मक स्वरुपाचा होता.

**०७.** सहायक सरकारी अभियोक्ता यांनी अभिलेखानुसार युक्तीवाद केला. आरोपीच्या विद्वान विधिज्ञांनी, आरोपीची निर्दोष मुक्तता करणेबाबत याचना केली.

०८. अभिलेखावरुन पुढील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे नोंदविण्यात येत आहेत;

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| ०१. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, दिनांक १२.०७.२०२२ रोजी १२.३० वाजताच्या सुमारास भानापुर फाटा तह. सावली येथे, आरोपीने त्याच्या ताब्यातील विना क्रमांकाचा ट्रॅक्टर हा सार्वजनिक रस्त्यावर मानवी जीवन व इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालविले व त्यानुषंगाने आरोपीने **भारतीय दंड संहिता, कलम २७९** अन्वये गुन्हा केले आहे ? | : | **...नकारार्थी** |
| ०२. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, उपरोक्त नमूद तारीख, वेळी व ठिकाणी, आरोपीने त्याच्या ताब्यातील विना क्रमांकाचा ट्रॅक्टर हा भरधाव वेगात, हयगयीने व निष्काळजीपणे चालवून प्रभाकर आबाजी पेंदाम यांच्या मोटारसायकलला जोराची धडक देवुन त्यांना साधी दुखापत करण्यास कारणीभूत ठरला व त्यानुषंगाने आरोपीने **भारतीय दंड संहिता, कलम ३३७** अन्वये शिक्षापात्र गुन्हा केले आहे ? | : | **...नकारार्थी** |
| ०३. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, उपरोक्त नमूद तारीख, वेळी व ठिकाणी, आरोपीने त्याच्या ताब्यातील विना क्रमांकाचे ट्रॅक्टर हा भरधाव वेगात, हयगयीने व निष्काळजीपणे चालवून प्रभाकर आबाजी पेंदाम यांच्या मोटारसायकलला जोराची धडक देवुन त्यांना जबर दुखापत करण्यास कारणीभूत ठरला व त्यानुषंगाने आरोपीने **भारतीय दंड संहिता, कलम ३३८** अन्वये शिक्षापात्र गुन्हा केले आहे ? | : | **...नकारार्थी** |
| ०४. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, उपरोक्त नमूद | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त नमुद वाहन हे सार्वजनिक रस्त्यावर, रस्त्याच्या परिस्थितीकडे व रहदारीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगाने व हयगयीने चालवून अपघात घडवून आणला व अपघातग्रस्त इसमास कोणताही वैद्यकीय उपचार न करता, तसेच पोलीसांना अपघाताची कोणतीही सुचना न देता, सदर इसमास जागेवर सोडून पलायन केले आणि त्याअन्वये **मोटार वाहन अधिनियमचे कलम १७७ सहकलम १३४** अन्वये शिक्षापात्र गुन्हा केले आहे ? | : | **...नकारार्थी** |
| ०५. | आदेश काय ? | : | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.०१ ते ०४ करीता :-**

**०९.** मुद्दा क्र.०१ ते ०४ हे एकमेकांशी संबंधीत असल्याने पुनरावृत्ती टाळण्याकरीता एकत्रीत चर्चीले आहेत. प्रस्तुत प्रकरणात साक्षीदार क्र.०२ रोशन प्रकाश पेंदाम व सा.क्र. ०६ मोरेश्वर नारायण आळे यांचे साक्षीत असे आले आहे की, दिनांक १२.०७.२०२२ रोजी सा.क्र. ०२ रोशन यास त्याचा मित्र सचिन कोलते याने त्यास फोनद्वारे त्याचे काका प्रभाकर पेंदाम यांचा भानापुर फाटा येथे अपघात झाल्याची माहिती मिळाल्यानंतर सा.क्र. ०२ व ०६ सदर ठिकाणी गेले. सदर ठिकाणी लाल रंगाचा टॅक्टर फन व कॅचबिल लावून उभा होता. तसेच प्रभाकर हे जखमी अवस्थेत पडले होते व त्यांची दुचाकी तेथे उभी होती. सदर साक्षीदारांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, प्रभाकर यांना पोलीस वाहनात पाथरी व त्यानंतर सावली येथील सरकारी दवाखान्यात आणि पुढे गडचिरोली येथे उपचार देण्यात आले. सदर घटनेबाबत सा.क्र. ०२ याने दिनांक २०.०७.२०२२ रोजी पोलीस स्टेशन, पाथरी येथे निशाणी १६ व

१७ अन्वये तक्रार दाखल केली होती. उभयता साक्षीदारांनी घटना प्रत्यक्ष पाहिली नसल्याचे मान्य केले.

**१०.** साक्षीदारांच्या कथनांवरुन असे निदर्शनास येते की, साक्षीदार क्र.०७ हा जखमी आहे. त्यामुळे त्याची साक्ष विवेचनास घेत आहे. त्यांच्या साक्षीत असे आले आहे की, दिनांक १२.०७.२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता तो दुचाकीवरुन पाथरी येथे जात असतांना भानापुर फाटा येथील बोळीजवळ आला असता समोरुन एक ट्रॅक्टर वाकडीतिकडी येत होती. त्यामुळे त्याने त्याची दुचाकी रस्त्याच्या कडेला घेतली. त्यावेळी समोरुन येणाऱ्या ट्रॅक्टरची मागील फन त्याचे उजव्या पायाला लागली व तो खाली पडला. त्यावेळी गावातील सचिन व त्याची आई यांनी त्यास पाणी पाजले व ट्रॅक्टर चालकास रोखले.

**११.** पुढे त्यांच्या साक्षीत असे आले आहे की, गाडीवरुन पडल्याने त्याचे पायातुन रक्त येत होते. ते पाहुन तो बेशुध्द झाला. त्यानंतर त्यास साक्षीदार क्र.०२ व ०३ यांनी सुरुवातीस पाथरी येथे व त्यानंतर सावली आणि पुढे गडचिरोली येथील दवाखान्यात उपचाराकरीता दाखल केले. उपचारा दरम्यान त्याच्या पायाची शस्त्रक्रिया झाली व पायात रॉड टाकण्यात आले. साक्षीदाराने त्यांच्या उलटतपसात घटनास्थळी सिंगल रस्ता होता. शेतात जाणारे ट्रॅक्टर व इतर वाहने त्याच रस्त्याने जातात असे कथन केले आहे. पुढे सदर साक्षीदाराने सुचक प्रश्नास नकारार्थी उत्तरे दिली.

**१२.** साक्षीदार क्र.०१ व १० हे घटनास्थळ पंच साक्षीदार असून अभियोगपक्षास सहकार्य करीत नाहीत. त्यांनी घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर अमान्य केला. सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही.

**१३.** साक्षीदार क्र. ०३ सचिन हरबाजी कोलते यांचे साक्षीत असे आले आहे

की, दिनांक १२.०७.२०२२ रोजी तो पाथरी येथुन त्यांचे गावी परत येत असतांना त्यांना भानापुर फाटयाजवळ ट्रॅक्टर व मोटारसायकलचा अपघात झाल्याचे दिसले व सदर ठिकाणी त्यांचे गावातील प्रभाकर पेंदाम हे जखमी अवस्थेत पडुन असल्याचे दिसले. करीता, त्याने साक्षीदार क्र.०२ रोशन पेंदाम यास फोनकरुन बोलाविले. त्यानंतर प्रभाकर यास सरकारी दवाखान्यात उपचारा करीता नेले. साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात घटना प्रत्यक्ष पाहिली नसल्याचे कथन केले आहे.

**१४.** साक्षीदार क्र. ०४ कौशल्याबाई हरबाजी कोलते यांचे साक्षीत असे आले आहे की, दिनांक १२.०७.२०२२ रोजी ती तिचे मुलासह पाथरी येथुन तिचे गावी परत जात असतांना प्रभाकर पेंदाम हा लाल ट्रॅक्टरला जाऊन आदळला व खाली पडला. त्यास त्यांनी पाणी पाजले व उपचारा करीता दवाखान्यात पाठविले. साक्षीदाराने तिच्याकडे चौकशी केली नसल्याबाबत उलटतपासात कथन केले आहे.

**१५.** साक्षीदार क्र.०५ कविता प्रभाकर पेंदाम हिचे साक्षीत असे आले आहे की, दिनांक १२.०७.२०२२ रोजी ती घरात असतांना दुपारी तिस तिच्या पतीचा व ट्रॅक्टरचा अपघात झाला आणि ट्रॅक्टर चालक हा दारु पिऊन असल्याचे कळाले. अपघातानंतर तिच्या पतीस गडचिरोली येथील दवाखान्यात दोन महिणे दाखल करण्यात आले. अपघातात तिच्या पतीस पायाला व कंबरेला जखमा झाल्या. साक्षीदाराने तिच्याकडे चौकशी केली नसल्याबाबत उलटतपासात कथन केले आहे.

**१६.** साक्षीदार क्र. ०८ खुशाल श्रावण मडावी यांचे साक्षीत असे आले आहे की, जुलै २०२२ मध्ये ते पो.ठा. पाथरी येथे हजर असतांना त्यांना ऐके दिवशी असोला-भानापुर फाटा येथे अपघात झाल्याची माहिती मिळाल्यानंतर ते इतर कर्मचाऱ्यासह घटनास्थळी गेले. तेथे भानापुर कडुन पाथरी येणाऱ्या रोड तलावाजवळ एक इसम जखमी अवस्थेत होता. त्याचे बाजुला अपघातग्रस्त मोटारसायकल व

रस्त्याच्या कडेला लाल रंगाचा नंबर प्लेट नसलेला चाकास कॅचव्हील व लोखंडी फन लावलेला ट्रॅक्टर उभा होता'

**१७.** सदर साक्षीदाराच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, घटनास्थळावरील जखमीचे नाव प्रभाकर पेंदाम असे होते. त्याने सदर जखमीस पाथरी येथील सरकारी दवाखान्यात व तेथुन पुढे सावली येथील ग्रामिण रुग्णालयात आणि त्यानंतर गडचिरोली येथील दवाखान्यात उपचाराकरीता दाखल केले. पुढे त्यांनी पंचासमक्ष निशाणी २९ अन्वये घटनास्थळ पंचनामा तयार केला. साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात सुचक प्रश्नास नकारार्थी उत्तरे दिली.

**१८.** साक्षीदार क्र. ०९ वसंत मारोती नागरीकर यांचे साक्षीत असे आले आहे की, तुमचे विरुध्द पाथरी पोलीस ठाणे अंतर्गत अपराध क्र. ९१/२०२२ चा तपास त्यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी तपासा दरम्यान प्रत्यक्षदर्शी व खबरी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. घटनेतील वाहन ताब्यात घेऊन त्यांची तपासणी करुन घेतली. तपासाअंती दोषारोपत्र न्यायालयात दाखल केले. साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात सुचक प्रश्नास नकारार्थी उत्तरे दिली.

**१९.** उभयता पक्षकारांच्या पुराव्याअंती अभियोग पक्षावर असे दायीत्व आहे की, यातील आरोपीने त्याच्या ताब्यातील विना क्रमांकाचा ट्रॅक्टर हा सार्वजनिक रस्त्यावर मानवी जीवन व इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे, व हयगयीने चालवून प्रभाकर आबाजी पेंदाम यांच्या मोटारसायकलला जोराची धडक देवुन त्यांना साध्या व जबर दुखापतीस कारणीभूत ठरला. तसेच अपघातग्रस्त इसमास कोणताही वैद्यकीय उपचार न करता, तसेच पोलीसांना अपघाताची कोणतीही सुचना न देता, सदर इसमास जागेवर सोडून पलायन केले.

२०. याठिकाणी अभियोग पक्षाने सर्वात प्रथम घटनेची वेळ, तारीख व घटनास्थळ हे सिध्द केले काय हे पाहणे गरजेचे आहे. वर्दी निशाणी क्र.१६ चे अवलोकन केले असता, घटना दिनांक १२.०७.२०२२ रोजी १२.३० वाजताचे सुमारास भानापुर फाटा येथे घडल्याचे कथन केले आहे. अभियोगपक्षाने पंच साक्षीदार म्हणून साक्षीदार क्र.०१ व १० यांची साक्ष नोंदविली. परंतु सदर साक्षीदार हे अभियोगपक्षास सहकार्य करित नाहीत. साक्षीदार क्र.०८ घटनेतील पोलीस साक्षीदार असून त्यांनी घटनास्थळी जावून चौकशी करुन घटनास्थळ पंचनामा निशाणी क्र.२९ तयार केल्याचे मान्य केले. अभियोगपक्षाचे इतर साक्षीदार घटनास्थळाबाबत तंतोतंत कथने करतात.

२१. अभियोगपक्षाचे इतर सर्व साक्षीदार घटनेतील वेळी व तारीख याबाबत तंतोतंत कथने करतात. बचावपक्षाच्यावतीने नोंदविण्यात आलेल्या उलटतपासाचे अवलोकन केले असता घटनेतील वेळ तारीख, महिना व वर्षाबाबत केवळ नाकारण्या व्यतिरिक्त अभिलेखावर दुजोरा देणारा पूरावा सादर केलेला आहे. अभिलेखावर आलेला पुराव्याद्वारे घटनेतील घटनास्थळ, वेळ, तारीख, महिना व वर्ष अभियोगपक्षाने सिध्द केले आहे.

२२. दुसरा महत्वाचा घटक की, नमुद घटनेच्या वेळी आरोपी त्याच्या ताब्यातील नमुद वाहन हे निष्काळजीपणे व बेदरकारपणे भरधाव वेगात चालवून त्याद्वारे अपघात घडवुन आणला काय. 'निष्काळजीपणा' म्हणजे एखाद्या व्यक्तीला ठरवून दिलेले काम नियमीत काळजीपूर्वक न करणे, जे की त्याने न केल्यामुळे इतरांना हानी होईल याची त्याला माहिती असणे. तसेच 'बेदरकारपणे' म्हणजे एखादी कृती नियमाने करणे उचित असते, परंतु, तो कृतीचे पालन न करता करणे, त्याला ते कृती अनियमीत किंवा न पालन करता केल्यावर त्याचा त्रास इतरांना होईल या गोष्टीचे भान असते.

२३. चालु प्रकरणात आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन हे काळजीपूर्वक न चालविता, गैरकृती घडवून येईल, त्याची जाण असताना सुध्दा चालवून तथाकथित घटना घडवून आणली का हे पाहणे गरजेचे आहे. निशाणी क्र.१६ वरील वर्दीचे अवलोकन केले असता, त्यामध्ये असे कथन केले आहे की, आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन साक्षीदार क्र.०७ यास धडक देवून साध्या व जबर दुखापत केल्या.

२४. याठिकाणी तथाकथित घटनेच्या वेळी नमुद वाहन आरोपी चालवित होता का, वर्दीदार साक्षीदार क्र.०२, याने घटनेबाबत वर्दी दिली असून घटनेतील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. सदर साक्षीदाराने तथाकथित वाहन आरोपीने चालविल्याबाबत पाहिलेले नाही. साक्षीदार क्र.०७ हे घटनेतील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. त्यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता घटनेच्या वेळी आरोपी सदर वाहन चालवत होता, हे कथन आले नाही. इतर साक्षीदारांच्या साक्षीचे अवलोकन केले असता, घटनास्थळावर आरोपी नमुद ट्रॅक्टर घेवून हजर असल्याबाबत कथने आलेली आहेत. साक्षीदार क्र.०८ व ०९ हे तपासीक अधिकारी आहेत, त्यांची साक्ष साहीत्यीक साक्ष असते. उपरोक्त अभिलेखावरील पुराव्याच्या अवलोकनार्थ तथाकथित घटनेच्या वेळी आरोपी वाहन चालवित होता, बाबत पुरावा निष्पन्न होत नाही.

२५. अभियोगपक्षाचे कथन की, आरोपी त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणाने व बेदरकारपणाने वेगात चालवत होता. उपरोक्त परिच्छेदाच्या विवेचनावरुन तथाकथित घटनेच्या वेळी आरोपी नमुद वाहन चालवत होता हे स्पष्ट झाले नाही. तसेच निशाणी क्र.१६ वरील वर्दीचे अवलोकन केले असता त्यामध्ये देखील आरोपी घटनेच्या वेळी नमुद वाहन निष्काळजीपणे व बेदरकारपणे चालवित होता असे कथन आलेले नाही. शिवाय अभियोगपक्षाचे साक्षीदार यांच्या साक्षीत सुध्द आरोपी हा तथाकथित घटनेच्या वेळी निष्काळजीपणाने व बेदरकारपणे चालवित होता,

असे आले नाही. उपरोक्त पुराव्याच्या अवलोकनांती तथाकथित घटनेच्या वेळी आरोपी हा त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणाने व बेदरकारपणे चालवित होता, हे सिध्द होत नाही.

२६. साक्षीदार क्र.०७ यांना तथाकथित घटनेच्या वेळी अपघातामध्ये जखमा झाल्या असून, सदर जखमा होण्यास आरोपी कारणीभुत आहे काय ? उपरोक्त पुराव्याचे अवलोकन केले असता तथाकथित घटनेच्या वेळेस सदर वाहन आरोपी चालवित होता हे सिध्द झालेले नाही. जखमी साक्षीदार यांनी असे कथन केले आहे की, एक ट्रॅक्टर समोरुन येत होता. त्याच्या ट्रॅक्टरचा फन त्यांच्या मोटारसायकलला लागला व ते खाली पडले. त्यामुळे त्यांना साध्या व जबर दुखापती झाल्या.

२७. साक्षीदार क्र.०६ यांची साक्ष या ठिकाणी महत्वाची ठरते. त्यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता, घटनास्थळी एक लाल रंगाचा ट्रॅक्टर फन लावून उभा होता. साक्षीदार क्र.०७ याने त्याची मोटारसायकल नेऊन सदर ट्रॅक्टरला धडक दिली. याशिवाय अभियोगपक्षाचे साक्षीदार क्र. ०२ ते ०६ यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्यांनी घटनास्थळ पाहिले नसल्याचे कथन केले आहे. तसेच अभियोगपक्षाने अभिलेखावरील वैद्यकीय प्रमाणपत्र, वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष नोंदवून सिध्द केले नाही. उपरोक्त पुराव्यावरुन आरोपीने साक्षीदार क्र.०७ यास धडक देवून साध्या व जबर दुखापती केल्या हे सिध्द होत नाही.

२८. अभियोपक्षाचे पुढे असे कथन की, तथाकथित घटनेच्या वेळी आरोपी हा त्याच्या ताब्यातील विना क्रमांकाचा ट्रॅक्टर हा सार्वजनिक रस्त्यावर मानवी जीवन व इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे, व हयगयीने चालवून प्रभाकर आबाजी पेंदाम यांच्या मोटारसायकलला जोराची धडक देवुन त्यांना साध्या व जबर दुखापतीस कारणीभूत ठरला. तसेच अपघातग्रस्त इसमास कोणताही वैद्यकीय

उपचार न करता, तसेच पोलीसांना अपघाताची कोणतीही सुचना न देता, सदर इसमास जागेवर सोडून पलायन केले अभिलेखाचे अवलोकन केले असता, अभियोग पक्षाने आरोपीची तथाकथित घटनेच्या वेळी तथाकथित वाहन चालवित होता हे अभियोगपक्षाने सिध्द केले नाही. तेव्हा आरोपीने साक्षीदार क्र.०७ यास वैद्यकीय उपचार न करता, पोलीसांना अपघाताची कोणतीही माहीती न देता, घटनास्थळावरुन पलायन केले, हे सिध्द होत नाही.

२९. फौजदारी खटल्यामध्ये आरोपी विरुध्द गुन्हा शाबीत होण्याकरीता गुन्हयांचा प्रत्येक टप्पा अभियोग पक्षाने सबळ व निर्विवाद पुराव्यामार्फत शक्यतेच्या पलिकडे जावून सिध्द करणे गरजेचे असते. उपरोक्त पुराव्याचे अवलोकनांती, तथाकथीत घटनेच्या वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील विना क्रमांकाचा ट्रॅक्टर हा सार्वजनिक रस्त्यावर मानवी जीवन व इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे, व हयगयीने चालवून प्रभाकर आबाजी पेंदाम यांच्या मोटारसायकलला जोराची धडक देवुन त्यांना साध्या व जबर दुखापतीस कारणीभूत ठरला. तसेच अपघातग्रस्त इसमास कोणताही वैद्यकीय उपचार न करता, तसेच पोलीसांना अपघाताची कोणतीही सुचना न देता, सदर इसमास जागेवर सोडून पलायन केले. हे अभियोग पक्षाने निःशंकपणे व संशयाच्या पलिकडे जाऊन सबळ, विश्वसनिय व ठोस पुरावा देऊन सिध्द केले नाही. करीता, **मुद्दे क्रमांक ०१ ते ०४ ची उत्तरे नकारार्थी नोंदविण्यात येत आहेत.**

**<u>मुद्दा क्रमांक ०५ करीता</u> –**

३०. उपरोक्त विवेचनावरुन मी या तथ्यविषयक व विधीविषयक निष्कर्षास आलो आहे की, अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द असलेल्या भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८ तसेच मोटार वाहन कायदा कलम १७७ सहकलम १३४ अन्वये

आवश्यक असलेला कोणताही पुरावा न्यायालयासमोर आणलेला नाही. त्यामुळे, आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. म्हणून मी **मुद्दा क्र.०५ चे निष्कर्षार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.**

**आदेश**

१) आरोपी **अशोक बाबुराव मेश्राम,** रा. हेटी वार्ड, पाथरी ता. सावली, यांची फौजदारी प्रक्रिया संहीताचे कलम–२४८(१) अन्वये, भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८ तसेच मोटार वाहन कायद्याचे कलम १७७ सहकलम १३४ अन्वयेच्या अंतर्गत शिक्षापात्र गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे बंधपत्र व जमानतपत्र रद्द करण्यात येते.

३) फौजदारी प्रक्रिया संहीताचे कलम ४३७–अ च्या अनुपालनाकरीता, आरोपीने पुढील सहा महीन्यांकरीता रक्कम रू.१५,०००/– चा नविन जामीन कदबा द्यावा.

(न्यायनिर्णय खुले न्यायालयात अधिघोषित असे)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHYAM SHIVAJI TONDACHIRE
Date: 2025.06.23 17:48:05 +0530

**स्थळः–** सावली

**दिनांक :–** २३.०६.२०२५.

( **श्याम एस. तोंडचिरे** )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सावली
जिल्हा चंद्रपूर.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणीत करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखाचे नाव : अमर खु. निखार (लघुलेखक ग्रेड-३)

न्यायालयाचे नाव : **श्री श्याम शि. तोंडचिरे**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(क.स्तर), सावली, जिल्हा चंद्रपूर.

न्यायनिर्णयाचा दिनांक : २३.०६.२०२५

न्यायिक अधिकारी यांनी सही केल्याचा दि. : २३.०६.२०२५